# प्रारुप नमुना - क
# जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, वाशिम
# ई- निविदा सुचना क्रं. 1

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा वाशिम कार्यालयातर्फे जिल्हयातील ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी, संनियत्रण, पर्यवेक्षण करणेसाठी अनुभवी व सुयोग्य बाहययंत्रणा संस्थेकडून एक प्रोग्रामर आणि 07 (सात) इतके डेटा एंन्ट्री ऑपरेटर हे मनुष्यबळ उपलब्ध करुन घेणेसाठी विहित नमुन्यातील ई- निविदा प्रणालीद्वारे Expression of Interest मागविणेत येत आहेत.

सदर ई - निविदा सुचना, परिशिष्टे इत्यादी www.mahatender.gov.in आणि www.zpwashim.nic.in या संकेतस्थळावर दिनांक 12/08/2020 ते दि.24/08/2020 रोजी 5.00 P.M. वाजेपर्यत उपलब्ध आहेत.

प्राप्त निविदा कारणे न देता नाकारणे अथवा स्विकारणेचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी तथा अध्यक्ष,जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा वाशिम यांनी स्वत:कडे राखुन ठेवले आहेत. तसेच निविदा अटी व शर्ती अर्जा सोबत उपलब्ध करुन देणेत येतील. सदरची निविदा कोणत्याही किमान कामाचा हक्क करत नाहीत.

प्रकल्प संचालक
जि. ग्रा. वि. यं. वाशीम

(दीपक कुमार मीना)(भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
कार्यकारी अध्यक्ष
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा
वाशिम

Scanned with CamScanner

**प्रारुप नमुना - क 1**

**संकेतस्थळावर प्रसिध्द करावयाच्या विस्तृत जाहिरातीचे प्रारुप**

**कार्यालय : जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा वाशिम**

**पत्ता : जुनी जिल्हा परिषद, वाशिम**

**दुरध्वनी क्रमांक : (07252) 235374**

**ई-निविदा जाहिरात क्रमांक- 01**

केंद्र शासनाच्या सर्वासाठी घरे (Housing to all) या जाहिर केलेल्या धोरणानुसार सन 2022 पर्यंत देशातील ग्रामीण भागांमध्ये घरे बांधावयाची आहेत. राज्यातील ग्रामीण भागांमध्ये विविध विभागांच्या ग्रामीण गृहनिर्माण योजना या जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालयामार्फत राबविणेत येत आहेत. सदर ग्रामीण घरकुल योजनांची प्रभावी अंमलबजावणी ही AwaasSoft द्वारे करणेत येत आहे. AwassSoft वर लाभार्थ्यांचे online Registration करणे, Ordersheet Generate करणे Online target upload करणे ई. कामांसाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, वाशिम कार्यालयात 1 प्रोग्रामर व 1 डेटा एन्ट्री ऑपरेटर आणि प्रत्येक पंचायत समिती कार्यालयात 1 डेटा एन्ट्री ऑपरेटर असे एकुण (06) इतके डेटा ऐन्ट्री ऑपरेटर जिल्हासाठी उपलब्ध करुन द्यावयाचे आहेत. त्यासाठी अशा प्रकारचे डेटा एंन्ट्री ऑपरेटर / प्रोग्रामर/ संगणकाचे ज्ञान असणारे/ टंकलेखनाचे ज्ञान असणारे मनुष्यबळ पुरवठा केलेचा अनुभव असणा-या बाहय यंत्रणेकडुन ई-निविदाद्वारे Expression Of Interest मागविणेत येत आहेत.

सदर ई- निविदा सुचना, परिशिष्टे ईत्यादी www.mahatender.gov.in आणि www.zpwashim.nic.in (जिल्हयाचे संकेतस्थळ) संकेतस्थळावर दि 10 /08 /2020 ते दिनांक 25/ 08/2020 रोजी 5.00 PM वाजेपर्यंत उपलब्ध आहेत.

कामाचे नांव- प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व इतर राज्य पुरस्कृत घरकुल योजने करीत जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा वाशिम कार्यालयांतर्गत एक प्रोग्रामर आणि (07) इतके डेटाएंन्ट्री ऑपरेटर उपलब्ध् करणे बाबत.

प्रकल्प संचालक
जि. ग्रा. वि. यं. वाशीम

## जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा वाशिम

## निविदे बाबतचा तपशील

| | |
|---|---|
| कामाचा अंदाजीत वार्षिक खर्च | रुपये 1947000/- |
| निविदा शुल्क | रुपये 4200/- |
| ईसारा रक्कम / बयाणा रक्कम | रुपये 70,000/- भरावी लागेल |
| सुरक्षा अनामत रक्कम / Parformance Bank Gurantee | कामाच्या अंदाजीत वार्षिक खर्चाच्या किमान 3 टक्के : रुपये 58500/- |
| निविदा प्रसिध्द करणे | दिनांक 10 / 08 /2020 रोजी सकाळी 10.00 वाजता |
| निविदा उपलब्ध कालावधी | दिनांक 10 / 08 /2020 दुपारी 2.00 पासुन दिनांक 24 / 08 /2020 रोजी सायं 5.00 वाजेपर्यंत |
| निविदा पुर्वक बैठक | दिनांक 14 / 08 /2020 रोजी सकाळी 11.00 वा. प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यं. जुनी जिल्हा परिषद, वाशिम यांचे दालनात |
| संपर्क अधिकारी | श्री डॉ. व्हि.एन. वानखडे, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा वाशिम ई-मेल - drdawashim@gmail.com |
| निविदा अर्जाच्या किंमतीचा DD, इसारा रक्कमेचा DD व निविदे संबंधित आवश्यक कागदपत्रांच्या प्रती online जमा करणेचा कालावधी | निविदा उपलब्ध कालावधी प्रमाणे |
| निविदा सादर करणेचा अंतिम दिनांक | दिनांक 24/08 /2020 वेळ दुपारी 5.00 वाजेपर्यंत |
| निविदा उघडण्याचा दिनांक | दिनांक 25/08 /2020 वेळ सकाळी 11.00 वा. |
| निविदा उघडण्याचे ठिकाण | प्रकल्प संचालक जि.ग्रा.वि.यं. यांचे दालनात |

प्राप्त निविदा कारणे न देता नाकारणे अथवा स्विकारणेचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांनी स्वत:कडे राखुन ठेवले आहेत. तसेच निविदा अटी व शर्ती अर्जासोबत उपलब्ध करुन देणेत येतील.सदरची निविदा कोणत्याही किमान कामाचा हक्क प्रस्तापित करत नाहीत.

Scanned with CamScanner

बाहय यंत्रणेकडून पुरविणेत येणा-या प्रोग्रामर आणि Data Entry Operator या मनुष्यबळाची पात्रता

1. **<u>प्रोग्रामर</u>**

a. वय - किमान 21 वर्ष व कमाल 50 वर्षापेक्षा जास्त असु नये.

b. शैक्षणीक पात्रता - BCA/BCS/MCS/MSC Computer मान्यता प्राप्त विद्यापीठ / शैक्षणीक संस्थेतुन उत्तीर्ण

c. AwassSoft हाताळणेचा / तत्सम कामाचा किमान 1 वर्ष अनुभव

d. एकत्रित मानधन - 20,000 रु मासिक

2. **डेटा एन्ट्री ऑपरेटर**

a. वय - किमान 21 वर्ष व कमाल 50 वर्षापेक्षा जास्त असु नये.

b. शैक्षणीक पात्रता -

- मान्यता प्राप्त विद्यापीठ / शैक्षणीक संस्थेतुन कोणत्याही शाखेतील उत्तीर्ण पदवीधारक
- मराठी टंकलेखन प्रती मिनीटास 30 शब्द इतक्या गतीने शासकीय प्रमाणपत्र, इंग्रजी टंकलेखन प्रती मिनिटास 40 शब्द इतक्या गतीचे शासकीय प्रमाणपत्र आवश्यक तथापी उपलब्ध नसलेस निवड झाल्यापासुन 9 महिन्याच्या कालावधीपर्यंत प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.
- MSCIT उत्तिर्ण प्रमाणपत्र
- Microsoft Word, Excel हाताळणेचे उत्तम ज्ञान
- AwassSoft हाताळणेचे ज्ञान / तत्सम संगणक प्रणाली कामाचा किमान 1 वर्ष अनुभव

c. एकत्रित मानधन - 15,000 रु मासिक

**<u>देय मानधन</u>**

बाहय यंत्रणेने वरिल पात्रते प्रमाणे प्रोग्रामर व डेटा एन्ट्री ऑपरेटर हे मनुष्यबळ उपलब्ध करुन द्यावयाचे आहे. त्या मोबदल्यात बाहय यंत्रणेस देय मानधनाच्या 10 % इतकी रक्कम सेवाशुल्क (Sevice Charges) व शासकीय देय

प्रकल्प संचालक
जि. ग्रा. वि. यं. वाशीम

Scanned with CamScanner

कर (सद्या GST) जिल्हा ग्रामीण विक[illegible]र्फत NEFT / RTGS द्वारे उपलब्ध करुन देणेत येईल. बाहय यंत्रणा संस्थेने उपलब्ध करुन दिलेल्या मनुष्यबळाच्या कामगार कायदयाप्रमाणे व इतर कायदयान्वये असलेल्या वैधानिक कपाती कराव्यात.

**<u>व्यवस्थेचा कालावधी</u>**

बाहय यंत्रणेकडून उपलब्ध करुन घेतलेल्या मनुष्यबळाच्या सेवा या दोन वर्षाच्या कालावधीकरीता उपलब्ध करुन घेणेसाठी सक्षम बाहययंत्रणेकडुन निविदा मागविणेत येत आहेत.

ई- निविदेद्वारे बाहययंत्रणेच्या माध्यमातुन मनुष्यबळ पुरवठा करणेसाठी जाहिरात देणे, बाहययंत्रणेची अंतिम निवड करणे, योग्य पात्रतेचे उमेदवार बाहययंत्रणेकडुन उपलब्ध करुन घेणे, बाहययंत्रणेकडुन प्राप्त मनुष्यबळ योग्य पात्रतेचे नसलेस नाकारणे, पुरवठा केलेल्या मनुष्यबळाचे काम समाधानकारक नसलेस पुरविलेले मनुष्यबळ बाहययंत्रणेकडे परत पाठविणे, पर्यायी मनुष्यबळ उपलब्ध करुन घेणे, बाहययंत्रणेच्या सेवा समाधानकारक नसलेस बाहययंत्रणेच्या सेवा संपुष्टात आणणे, बाहययंत्रणे विरुध्द व बाहययंत्रणेने पुरविलेल्या मुनष्यबळा विरुध्द आवश्यक ती कायदेशीर / फौजदारी कार्यवाही करणे ईत्यादी बाबतचे सर्व अधिकार खाली स्वाक्षरी करणा-यांना आहेत.

6/08/20

**प्रकल्प संचालक**
**जि. ग्रा. वि. यं. वाशीम**

**मुख्य कार्यकारी अधिकारी तथा**
**कार्यकारी अध्यक्ष**
**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा**
**वाशिम**

Scanned with CamScanner

प्रारुप नमुना - क 2

## संकेतस्थळावर प्रसिध्द करावयाच्या निविदेच्या अटी व शर्ती

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद वाशिम तथा अध्यक्ष, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा वाशिम यांचेकडून जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा वाशिम कार्यालयात एक प्रोग्रॅमर एक डेटा एन्ट्री ऑपरेटर व (06) तालुक्यांत प्रत्येकी एक याप्रमाणे (06) इतके डेटा एन्ट्री ऑपरेटर बाहययंत्रणेकडून उपलब्ध करावयाचे आहेत. यासाठी कामाचा पुरेसा अनुभव असलेल्या बाहययंत्रणाकडून ई - निविदा प्रणालीद्वारे एक लिफाफा पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहे. सदर कामाचा अंदाजीत वार्षिक खर्च रक्कम रुपये. 19.47 लक्ष इतका आहे. या कामासाठी खाली नमुद केलेल्या अटी व शर्ती लागू राहतील.

1.ई - निविदा फी रुपये 4200/- व इसारा रक्कम रुपये 70,000/- Online पध्दतीने SBI Net Banking किंवा NEFT द्वारे भरणा करावा (या रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही. इसारा रक्कम भरलेली नसल्यास निविदेचा विचार करता येणार नाही. तसेच इसारा रक्कम भरण्यातुन सुट असल्यास तसे दर्शविणारे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.)

2.निविदा स्विकृतीचा कालावधी दिनांक / /2020 ते दिनांक / /2020 असुन प्राप्त निविदा दिनांक / /2020 रोजी सकाळी 11.00 वाजता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तथा अध्यक्ष, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांचे समक्ष उघडण्यात येतील.

3.निविदा पुर्व बैठक :- दिनांक / /2020 रोजी सकाळी 11.00 वाजता प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांचे दालनात

4.सदर ई-निविदा वाशिम जिल्हयांचे संकेतस्थळ (www.zpwashim.nic.in) व www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल.

5. ई - निविदेत खालील कागदपत्रांच्या प्रती upload करणे आवश्यक आहे.

a) Pan Card ची सांक्षांकित प्रत

b) आर्थिक वर्ष 2015-16, आर्थिक वर्ष 2016-17, आर्थिक वर्ष 2017-18, आर्थिक वर्ष 2018-19 व आर्थिक वर्ष 2019-20 चे आयकर विवरणपत्र

c) सेवाकर / GST नोंदणी प्रमाणपत्राची सांक्षांकित प्रत तसेच आर्थिक वर्ष 2015-16, आर्थिक वर्ष 2016-17, आर्थिक वर्ष 2017-18, आर्थिक वर्ष 2018-19 व आर्थिक वर्ष 2019-20 चे सेवाकर भरल्याचे प्रमाणपत्र.

d) कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटन कार्यालय (EPFO)यांचेकडील नोंदणीप्रमाणपत्र

e) ESIC कार्यालय यांचेकडील नोंदणीप्रमाणपत्र

f) कामगार कल्याण निधी कार्यालय यांचेकडील नोंदणीप्रमाणपत्र

g) व्यवसाय कर कार्यालय यांचेकडील नोंदणीप्रमाणपत्र

h) GST नोंदणी प्रमाणपत्र

i) महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम, 1948 नुसार नोंदणीप्रमाणपत्र (नुतनीकरणासह)

j) शासकीय/निमशासकीय/केंद्र शासकीय कार्यालयाना डेटा एन्ट्री ऑपरेटर/प्रोग्रॅमर/संगणकाचे ज्ञान असणारे/टंकलेखनाचे ज्ञान असणारे मनुषयबळ पुरवठा केल्याचा तपशील व प्रमाणपत्र तसेच केलेल्या कामाचा कार्यारंभ आदेश व काम समाधानकारकरित्या केल्याबाबतचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

k) शासकीय/निमशासकीय/केंद्र शासकीय कार्यालयामध्ये काळया यादीत नाव समाविष्ट नसलेबाबतचे प्रमाणपत्र निविदाकाराने देणे आवश्यक राहिल

प्रकल्प संचालक
जि. ग्रा. वि. यं. वाशीम

Scanned with CamScanner

l) निविदे सोबत सादर केलेल्या सर्व कागदपत्रांच्या व नोंदणी प्रमाणपत्राच्या सत्यप्रती सांक्षाकिंत केलेल्या असल्या पाहिजे.

m) उदयोग उर्जा व कामगार विभाग यांच्या दिनांक 1/12/2016 च्या शासन निर्णयातील परिच्छेत 4.2 नुसार कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेला निविदा प्रक्रीयमध्ये भाग घेणा-या अन्य संस्थेमध्ये थेट स्वारस्य असू नये. असे थेट स्वारस्य असल्यास तो हितसंबधांचा संघर्ष म्हणुन समजण्यात येईल व परिणामी दोन्ही किंवा अधिक निविदा नाकारण्यात येतील.

n) सोबत जोडलेल्या विहित नमुन्यामध्ये बाहययंत्रणेचा तपशील भरुन सादर करणे.

6. ज्या बाहय यंत्रणा संस्थेला काम मंजुर करणेत येईल. तीला कामाचा आदेश देणे पुर्वी त्यांचेकडून रक्कम रुपये 500/- च्या बॉन्ड पेपर वर मुख्य कार्यकारी अधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांनी निश्चित केलेल्या अटी व शर्तीसह बंधपत्र नोटरी करुन लिहून घेणेत येईल. तसेच Performance Bank Gurantee Certificate घेणेत येईल.

7. सदर निवीदेचा कालावधी 02 वर्षा चा राहील. पुरवठाआदेश व करारनामा प्रथम 11 महीन्याकरिता करण्यात येईल परंतु मा. संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष , ग्रामीण गृहनिर्माण विभाग यांचे पत्र क्र. जा.क्र. /रा.व्य.क.ग्रा. गृ/आस्था/1848/ 2020 दि. 08/01/2020 अन्वये कळविल्यानुसार दोन वर्षाच्या कालावधीसाठी अथवा नविन धोरण निश्चीत होउन अंमलबजावणी करणे या पैकी जो कालावधी कमी असेल या कालावधीसाठी उपलब्ध करण्यात येत आहे.

8. मंजुर निविदा धारक काम करणेस असमर्थ टरल्यास इतर कोणत्याही बाहययंत्रणा संस्थेकडून काम करुन घेणेत येईल व जादा खर्च झाल्यास तो मंजुर निविदा धारकाकडून वसुल करणेत येईल.

9. डेटा एन्ट्री ऑपरेटर / प्रोग्रॅमर कामावर असताना त्यांना काही अपघात झाल्यास त्यांची नुकसान भरपाई करणे ही संबंधित बाहययंत्रणेची जबाबदारी राहिल.

10. निविदा धारकांने सादर केलेले निविदा दर हे निविदा मंजुर झालेल्या दिनांकपासुन 90 दिवसांपर्यत स्विकृतीस पात्र राहतील.

11. निविदेत सहभागी निविदाकारने निविदा प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्यावर निवेदेतून माघार घेतलेस त्यांची इसारा रक्कम जप्त करणेत येईल.

12. निविदा मंजुर करणे अगर नाकारणे आणि आवश्यक वाटल्यास विभागून देणे हे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, अध्यक्ष जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांनी राखून ठेवलेले आहेत.

13. वाशिम जिल्हयास मनुष्यबळ पुरविणा-या संस्थेस त्यांचे काम समाधानकारक असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

14. निविदेतील कोणताही भाग अथवा सर्वच निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा हक्क मा. मुख्य कार्यकारी अधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा वाशिम यांनी राखून ठेवला आहे.

15. मनुष्यबळ पुरवठा करणारी बाहययंत्रणा ही कंपनी कायदा 1956 अंतर्गत / Partnership Act अंतर्गत / Proprietory Act अंतर्गत / Cooperation Act अंतर्गत / Bombay Public Trust अंतर्गत यापैकी कोणत्याही एका कायदयान्वये नोंदणी झालेली व संबंधित बाहययंत्रणेच्या कायदयाच्या मुख्य उददिष्टामध्ये मनुष्यबळ पुरवठा करणेची तरतुद असणे अनिवार्य आहे. अशाच नोंदणीकृत मनुष्यबळ पुरवठा करणा-या बाहययंत्रणेकडून निविदा स्वीकारणेत येईल.

16. संबंधित मनुष्यबळ पुरवठा करणा-या नोंदणीकृत बाहययंत्रणेने सर्व लागू असणारे कामगार कायदे व संबंधित कायदे यांची पुर्तता करणे आवश्यक राहिल.

17. निवड झालेल्या बाहययंत्रणेस देय असलेले मानधन अदा करणेत येईल व बाहययंत्रणेमार्फत सदर मानधन संबंधितांना अदा करावे लागेल. बाहययंत्रणेस मानधन अदा करण्यापूर्वी मानधनातून नियमानुसार लागू असलेला आयकर (TDS) कपात करुन मानधन अदा करण्यात येईल.

18. संबंधित मनुष्यबळ पुरवठा करणा-या नोंदणीकृत बाहययंत्रणेने पुरविलेल्या प्रोग्रॅमर / डेटा एन्ट्री ऑपरेटर यांचे शासन निर्णयानुसार प्रोग्रमर / डेटा एन्ट्री ऑपरेटर यांना अनुक्रमे रक्कम रुपये 20000/- व रक्कम रुपये 15000/- प्रति महा देय मानधन त्यांना NEFT / RTGS द्वारे संबंधिताच्या बँक खात्यात जमा करणे बाहययंत्रणेस बंधनकारक राहील.

19. मनुष्यबळ पुरवठा करणा-या बाहययंत्रणेने (1) प्रोग्रॅमर व (07) इतके डेटा एन्ट्री ऑपरेटर मनुष्यबळ जिल्हयासाठी उपलब्ध करुन दयावयाचे आहेत. भविष्यात या पदांच्या संख्येमध्ये वाढ अथवा घट झाल्यास

प्रकल्प संचालक
जि. ग्रा. वि. यं. वाशीम

Scanned with CamScanner

त्यानुसार आवश्यक प्रोग्रॅमर / डेटा एन्ट्री ऑपरेटर पुरविण्याची / घटविण्याची जबाबदारी मंजुर निविदा धारकांची राहिल. कोणत्याही कारणास्तव सदर पुरवठा करण्याची जबाबदारी नाकारता येणार नाही.

20. मनुष्यबळ पुरवठा करताना बाहययंत्रणेने जाहिरातीत नमुद केलेल्या शैक्षणिक पात्रतेनुसारच प्रोग्रॅमर / डेटा एन्ट्री ऑपरेटर यांचे नाव, भ्रमणध्वनी क्र, कायमस्वरुपी पत्ता, तात्पुरता पत्ता, शैक्षणिक पात्रता, अनुभव प्रमाणत्र इत्यादी माहितीसह 1:2 याप्रमाणात मनुष्यबळ उपलब्ध करुन दयावे. खात्री पटविणेसाठी त्यांच्या पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्राची सत्यप्रत सादर करावी. (सत्यता पडताळणीसाठी मूळ प्रमाणपत्र आणावे) उपलब्ध करुन देणेत आलेल्या मनुष्यबळाची पात्रता तपासून त्यापैकी योग्य मनुष्यबळाच्या सेवा मुख्य कार्यकारी अधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा वाशिम यांनी बाहययंत्रणेमार्फत उपलब्ध करुन घ्याव्यात.

21. प्रोग्रॅमर / डेटा एन्ट्री ऑपरेटर यांचे कामकाजाबाबत कार्यालयाकडून तक्रारी प्राप्त होणार नाहीत याबाबत पुर्ण दक्षता मनुष्यबळ पुरवठा करणा-या नोंदणी कृत बाहययंत्रणेने घ्यावी. कामकाजाबाबत तक्रार आलेस त्याबाबतची संपुर्ण जबाबदारी बाहययंत्रणेची राहिल.

22. बाहययंत्रणेद्वारे सेवेकरिता पुरविणेत आलेले प्रोग्रॅमर / डेटा एन्ट्री ऑपरेटर नेमूण देण्यात आलेले काम व्यवस्थित करित नसतील तर त्यांना त्यांचे देय मानधन अनुज्ञेय राहणार नाही. प्रकल्प संचालक , जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा याबाबत आवश्यक चौकशी करुन मानधन कपात करणे अथवा तदनुषंगिक निर्णय घेतील.

23. निविदेतील अटी व शर्ती शिथिल करणेचे संपुर्ण अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी अध्यक्ष, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांनी राखून ठेवलेले आहेत.

24. अपु-या शासकीय निधी अभावी किंवा तांत्रिक अडचणीमुळे मानधन देण्यास विलंब झाल्यास सदरील रक्कमेवरील व्याजाची मागणी करता येणार नाही.

25. निविदेसोबत सादर करणेत आलेल्या कागदपत्राच्या / प्रमाणपत्रच्या सत्य प्रती सांक्षाकिंत केलेल्या असाव्यात. त्या विषयी शंका उत्पन्न झाल्यास मुळ प्रत सादर करावी लागेल.

26. बाहययंत्रणेस निश्चित केलेल्या अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक राहील.

27. शासनाचे उदगंम कर कपात (TDS) धोरणानुसार मंजुर कंत्राटदाराचे देयकातील दर कपात नियमानुसार होऊन आयकर विभागाकडे परस्पर जमा होईल.

28. उपरोक्त अटी व शर्ती खेरीज मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, वाशिम तथा अध्यक्ष, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा वाशिम यांना परिस्थिती व आवश्यकतेनुसार इतर नवीन अटी व शर्ती समाविष्ट करणेचा अधिकार राहील.

29. सदरील जाहिर निविदेबाबत कोणत्याही प्रकारचा वाद निर्माण झालेस तो संबंधित जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालयाच्या वाशिम , जिल्हा न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात राहिल.

30. करारातील अटी व शर्तीचा भंग केल्यास संबंधित मनुष्यबळ पुरवठा करणारे नोंदणी कृत संस्था / कंपनी यांचे नांव काळयायादीत टाकण्याची कार्यवाही करणेत येईल.

31. संस्थे मार्फत पुरविणेत येणा-या मनुष्यबळाची वेळ ही संबंधित कार्यालयीन कामाच्या वेळेनुसार असेल. कामाची निकड पाहून शासकीय सुटटीच्या दिवशी तसेच कार्यालयीन वेळेनंतर ही सदर मनुष्यबळास उपस्थित रहाणेस बंधनकारक आहे व या करिता स्वंतत्र मोबदला देणेत येणार नाही.

32. संबंधित मनुष्यबळांने कामाच्या ठिकाणी गोपनियता व तेथे लागू असणारे नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे.

33. मनुष्यबळ पुरवठा करणा-या बाहययंत्रणेने उपलब्ध करुन दिलेले मनुष्यबळ / डेटा एन्ट्री ऑपरेटर हे पंचायत समिती स्तरावर गट विकास अधिकारी यांचे नियंत्रणाखाली कार्यरत रहातील. सदरील मनुष्यबळास आदेश दिलेपासुन 10 दिवसांचे आत संबंधित पंचायत समिती कार्यालयात हजर राहावे लागेल.

34. मनुष्यबळ पुरवठा करणा-या बाहययंत्रणेने पुरविलेले मनुष्यबळ हे प्रोग्रॅमर, डेटा एन्ट्री ऑपरेटर यांचे कर्तव्य व जबाबदा-या परिशिष्ट अ प्रमाणे पार पाडणे अनिवार्य आहे. याबाबतची सर्वस्वी जबाबदारी बाहययंत्रणेची राहील.

35. मनुष्यबळ पुरवठा करणा-या बाहययंत्रणेने उपलब्ध करुन दिलेले प्रोग्रॅमर / डेटा एन्ट्री ऑपरेटर यांनी कोणत्याही प्रकारे चुकीची माहिती (जसे A/C No, Aadhar No,NREGA Job/card No.) लाभार्थ्यांचे Online Registation करताना Signatory I & II Registatiion, activate / deactivate / delete करणे

प्रकल्प संचालक
जि. ग्रा. वि. यं. वाशीम

Scanned with CamScanner

इत्यादी बाबत चुकीची माहिती राज्य स्तरावर उपलब्ध करुन दिली व त्यामुळे कोणत्याही प्रकारची प्रशासकीय किंवा आर्थिक अनियमितता झालेस संबंधित अनियमिततेची जबाबदारी संबंधित प्रोग्रॅमर / डेटा एन्ट्री ऑपरेटर यांची राहील. पर्यायाने अशा रकमेची एक रकमी वसुली बाहययंत्रणेकडून आणि संबंधित मनुष्यबळाकडून करणेत येईल.

36. मनुष्यबळ पुरवठा करणा-या बाहययंत्रणेने उपलब्ध करुन दिलेल्या प्रोग्रॅमर / डेटा एन्ट्री ऑपरेटर यांचे बाबत तक्रार, कामामधील अनियमितता इत्यादी मुळे प्रोग्रॅमर / डेटा एन्ट्री ऑपरेटर यांच्या सेवा संपुष्टात आणणेत येतील. पर्यायी मनुष्यबळ संस्थेने 8 दिवसाचे आत जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालयास देणे बंधनकारक राहील. मनुष्यबळाने स्वत:हून राजीनामा देणे, कामावर येणेस नकार देणे अशा परिस्थितीत बाहय यंत्रणेद्वारे 5 दिवसांचे आत पर्यायी मनुष्यबळ उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे.

37. तालुकास्तरावरील गट विकास अधिकारी हे बाहय यंत्रणे मार्फत पुरविणेत आलेल्या मनुष्यबळास कामाबाबत मार्गदशन करतील. डेटा एन्ट्री ऑपरेटर हे गट विकास अधिकारी यांचे निर्देशाप्रमाणे दैनंदिन कामकाज करतील व गट विकास अधिकारी यांना अहवाल सादर करतील.

38. मनुष्यबळ पुरवठा करणा-या बाहययंत्रणेने पात्रतेप्रमाणे प्रोग्रॅमर व डेटा एन्ट्री ऑपरेटर हे मनुष्यबळ उपलब्ध करुन दयावयाचे आहे. त्या मोबदल्यात बाहययंत्रणेस देय मानधनाच्या 10 टक्के इतकी रक्कम सेवा शुल्क (Service charges) व शासकीय देय कर (GST) जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणे मार्फत NEFT द्वारे उपलब्ध करुन देणेत येईल.

39. मनुष्यबळ पुरवठा करणा-या बाहययंत्रणेमार्फत उपलब्ध करुन देणेत आलेल्या प्रोग्रॅमर यांनी प्रशिक्षण, आढावा सभा इत्यादी करिता राज्यस्तरावर उपस्थित राहिल्यास तसेच तालुकास्तरावर प्रशिक्षण,आढावा सभा इत्यादी करिता उपस्थित राहिल्यास आणि डेटा एन्ट्री ऑपरेटर यांनी प्रशिक्षणाच्या अनुषंगाने, राज्यस्तरावरील व जिल्हास्तरावरील मिटींगसाठी उपस्थित रहाणे कामी जर प्रवास केला तर त्यांना प्रवास भत्ता व दैनिक भत्ता वर्ग 3 कर्मचा-यास देय असणा-या तरतुदी प्रमाणे देणेत येईल.

40. बाहययंत्रणा ही कंपनी अधिनियम 1956 अंतर्गत/Partnership Act अंतर्गत/Proprietory Act अंतर्गत/Bombay Public Trust अंतर्गत यापैकी कोणत्याही एका कायदयान्वये नोंदणी झालेली व संबंधित बाहययंत्रणेच्या कायदयाच्या मुख्य उदिदष्टामध्ये मनुष्यबळ पुरवठा करणेची तरतुद असणे अनिवार्य आहे.तसेच सदर बाहययंत्रणेच्या स्वरुपामध्ये काही कालावधीनंतर बदल झाला असेल तर त्या त्या संवर्गानुसार त्यांचा अनुभव वेगवेगळा ग्राहय धरुन त्यानुषंगाने गुणदान करण्यात येईल

41. वरील अटी व शर्तींचे उल्लघंन केल्यास निविदाधारक फौजदारी कारवाईस पात्र राहतील तसेच त्यांचेSecurity Deposit / Perfromance Bank Gurantee Certificate जप्त करणेत येतील.

## सुरक्षा अनामत (Security Deposit) / Perfromance Bank Gurantee Certificate

ज्या निविदाधारकांची निविदा स्वीकृत केली जाईल. त्या निविदाधारकांने **रुपये 58500/- (अक्षरी ) रुपये अठावन्न हजार पाचशे फक्त** इतकी रक्कम सुरक्षा अनामत रक्कम Demand Draft द्वारे CEO, Zilla Parishad, Washim यांचे नावाने भरणे आवश्यक राहिल किंवा Performance Bank Guarantee Certificate स्वरुपात भरणे आवश्यक राहिल. (या रक्कमेवर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.)

जर निविदाधारकांनी निविदा स्वीकृतीच्या दिनांकापासुन 15 दिवसांचे आत सुरक्षा अनामत रक्कम / Performance Bank Guarantee Certificate कार्यालयास सादर केले नाही तर त्यांची निविदा रद्द करणेत येऊन त्यांचे निविदे सोबत भरणा केलेली इसारा रक्कम जप्त करणेत येईल.

## करारनामा

मंजुर निविदाधारकास मुख्य कार्यकारी अधिकारी, अध्यक्ष जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांचेसोबत रक्कम रुपये 500/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन दयावा लागेल. करारनाम्यातील कोणत्याही अटीच्या अर्थाबाबत किंवा इतर कोणत्याही बाबतीत वादविवाद उदभवल्यास मुख्य कार्यकारी अधिकारी, तथा अध्यक्ष, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, वाशिम यांचा निर्णय बंधनकारक व अंतिम राहील.

**प्रकल्प संचालक**
**जि. ग्रा. वि. यं. वाशीम**

Scanned with CamScanner

## प्रारुप नमुना - क 3

## निविदा लिफाफा ऋ 1 अर्ज

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
अध्यक्ष, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, वाशिम
जुनी जिल्हा परिषद, वाशिम

**विषय - प्रोग्रॅमर / डेटा एन्ट्री ऑपरेटर या पदावर मनुष्यबळ पुरविण्याबाबतची निविदा**

दिनांक आपले कार्यालयाच्या जाहिरातीनुसार जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, वाशिम कार्यालयात डेटा एन्ट्री ऑपरेटर या काल्पनिक पदाच्या कामाकरिता मनुष्यबळ पुरविण्याबाबतची निविदा भरत आहोत.

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | ई - निविदा खरेदी फी | : | |
| | इसारा रक्कम | : | |
| 2 | निविदाधारकाचे नांव व संपूर्ण पत्ता | : | |
| 3 | संस्था / कंपनी / फर्म असल्यास त्यांचा तपशिल | : | मनुष्यबळ पुरवठा करणारी नोंदणीकृत कंपनी / संस्था |
| | (अ) नोंदणीचा तपशील | : | |
| | (ब) व्यवस्थापकाचे नांव व पत्ता | : | |
| 4 | संपर्काचा तपशील | : | |
| | (अ) दुरध्वनी क्रमांक | : | |
| | (ब) फॅक्स क्रमांक | : | |
| | (क) संकेतस्थळ | : | |
| 5 | आयकर,पॅन कार्ड क्रंमाक व सांक्षाकिंत प्रत | : | प्रत जोडलेली आहे / नाही |
| 6 | आयकर विवरणपत्राची मागील 5 आर्थिक वर्षाची प्रमाणीत प्रत (2015- 2016, 2016 -2017, 2017-18, 2018-19, 2019-20) | : | 1) 2015-16 होय / नाही<br>2) 2016-17 होय / नाही<br>3) 2017-18 होय / नाही<br>4) 2018-19 होय / नाही<br>5) 2019-20 होय / नाही |
| 7 | सेवाकर नोंदणी क्रमांक | : | |
| 8 | सेवाकर नोंदणी प्रमाणपत्र | : | प्रत जोडलेली आहे / नाही |
| 9 | 2015-16, 2016-17,2017-18,2018-19,2019-20 या आर्थिक वर्षामध्ये सेवाकर भरल्याचे विवरणपत्राचा तपशील | : | |
| 10 | कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटन कार्यालय यांचेकडील नोंदणी प्रमाणपत्र (Employer & Employee Contribution) | : | |
| 11 | ESIC कार्यालयाकडील नोंदणी प्रमाणपत्र (Employer & Employee Contribution) | : | |
| 12 | कामगार कल्याण निधी कार्यालयाकडील नोंदणी | : | |

प्रकल्प संचालक
जि. ग्रा. वि. यं. वाशीम

Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| | प्रमाणपत्र | | |
| 13 | व्यवसाय कर नोंदणी प्रमाणपत्र (Employer & Employee Contribution) | : | |
| 14 | GSTI नोंदणी प्रमाणपत्र | : | |
| 15 | मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम 1948 नुसार नोंदणीप्रमाणपत्र (नुतनीकरणासह) क्रमांक, दिनांक | : | प्रत जोडलेली आहे / नाही |
| 16 | मागील 5 वर्षातील उलाढाल (Audit Reports) | : | 1) 2015-16 होय / नाही<br>2) 2016-17 होय / नाही<br>3) 2017-18 होय / नाही<br>4) 2018-19 होय / नाही<br>5) 2019-20 होय / नाही |
| 17 | अनुभव प्रमाणपत्र | : | |
| 18 | उपलब्ध साधन सामुग्री व मनुष्यबळ | : | |
| 19 | काळया यादीत नांव समाविष्ट नसल्याबाबतचे प्रमाणपत्र | : | |
| 20 | निविदा भरावयाच्या दिनांकास संस्थेकडे शिल्लक रकमेचे Bank Balance Certificate | : | |
| 21 | जाहिरातीत नमुद मानधनांची रक्कम मान्य आहे. असे प्रमाणीत केलेले प्रमाणपत्र | : | |
| 22 | निविदा अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रमाणपत्र | : | |
| 23 | निविदा दाखल करण्याबाबत देण्यात आलेले प्राधिकारी पत्र | : | |

ठिकाण -

दिनांक -

निविदाधारकांचे नांव ---

सही व शिक्का

प्रकल्प संचालक

जि. ग्रा. वि. यं. वाशीम

Scanned with CamScanner

## निविदेसोबत जोडावयाचे निश्चित दराचे परिशिष्ट

बाहययंत्रणेचे नांव व पत्ता - ------------------------------------------------------------------------

- प्रति प्रोग्रॅमर मानधन - रुपये 20000/-
- बाहययंत्रणेकडून प्रोग्रॅमर यांना देणेत येणारे मानधन - रुपये 20000/-
- प्रति डेटा एन्ट्री ऑपरेटर मानधन - रुपये 15000 /-
- बाहययंत्रणेकडून डेटा एन्ट्री ऑपरेटर यांना देणेत येणारे मानधन - रुपये 15000/-
- बाहययंत्रणेचे सेवा शुल्क प्रति प्रोग्रॅमर - रुपये 2000/-
- बाहययंत्रणेचे सेवा शुल्क प्रति डेटा एन्ट्री ऑपरेटर - रुपये 1500/-

ठिकाण -
दिनांक -

निविदा धाराकाची स्वाक्षरी
नाव पुर्ण पत्ता व शिक्का

## बाहय यंत्रणेने सादर करावयाचे प्रमाणपत्र (संस्थेच्या लेटर हेडवर)

मी / आम्ही खालील सही करणार ----- लिहून देतो / देते की, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा ---- (जिल्हयांचे नांव ) अंतर्गत जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालयाकरिता एक प्रोग्रॅमर व एक डेटा एन्ट्री ऑपरेटर आणि प्रत्येक तालुक्यास एक डेटा एन्ट्री ऑपरेटर याप्रमाणे ------ इतके डेटा एन्ट्री ऑपरेटर या पदांकरिता मनुष्यबळ पुरविण्याबाबतची निविदा भरीत असुन नियमावलीतील वर नमुद संपुर्ण नियम व अटी मी / आम्ही काळजीपुर्वक वाचल्या असुन मला / आम्हाला संपुर्णत: मान्य आहेत. त्याप्रमाणे या निविदा अर्जासोबत जी आवश्यक कागदपत्रे जोडण्यात आलेली आहे. त्यांची यादी सोबत जोडली आहे. उपरोक्त संपुर्ण नियम व अटी पुरवठा कालावधीत माझ यावर / आमचेवर बंधनकारक राहतील यांची मला / आम्हाला स्पष्ट कल्पना आहे. करिता खालील स्वाक्षरी करीत आहे / आहोत.

ठिकाण -
दिनांक -

निविदा धाराकाची स्वाक्षरी
नाव पुर्ण पत्ता व शिक्का

प्रकल्प संचालक
जि. ग्रा. वि. यं. वाशीम

Scanned with CamScanner

प्रारुप नमुना - ब

## बाहययंत्रणेची निवड करताना विचारात घ्यावयाचे गुणांकन

| अ.क्र. | विवरण | गुण | विश्लेषण |
|---|---|---|---|
| 1 | डेटा एन्ट्री ऑपरेटर / प्रोग्रॅमर या स्वरुपाचे मनुष्यबळ पुरविणेचा अनुभव | 40 | मागील वर्षामध्ये बाहययंत्रणेने सरासरी किती डेटा एन्ट्री ऑपरेटर/प्रोग्रॅमर/संगणकाचे ज्ञान असणारे/ टंकलेखनाचे ज्ञान असणारे मनुष्यबळ उपलब्ध करुन दिले आहे. त्यानुसार गुणदान करणेत यावे. |
| 2 | मागील 5 वर्षाचा लेखा परिक्षण ताळेबंद | 15 | मागील 5 वर्षाचे बाहययंत्रणेचे C.A Audit. Balance Sheet यांचे अहवाल पाहून त्यानुसार प्रतिवर्ष 3 गुण देणेत यावे. |
| 3 | शासकीय यंत्रणेसोबत काम करणेचा अनुभव | 15 | शासकीय संस्थेला डेटा एन्ट्री ऑपरेटर /प्रोग्रॅमर/संगणकाचे ज्ञान असणारे/ टंकलेखनाचे ज्ञान असणारे मनुषयबळ पुरवठा केलेचा अनुभव असलेस गुणदान देणेत यावे. |
| 4 | . स्थानिक बाहययंत्रणा | 10 | बाहययंत्रणेचे नोंदणीकृत मुख्यालय हे संबंधित जिल्हयामधे असलेस आणि त्याच जिल्हयामधे डेटा एन्ट्री ऑपरेटर /प्रोग्रॅमर/ संगणकाचे ज्ञान असणारे/ टंकलेखनाचे ज्ञान असणारे मनुषयबळ पुरवठा केलेस गुणदान देणेत यावे. |
| 5 | आर्थिक,वार्षिक उलाढाल पात्रता | 20 | बाहययंत्रणेच्या वार्षिक उलाढालीनुसार प्रत्येकी 2 गुण देणेत यावे. |
| | एकुण | 100 | |

संबधित बाहययंत्रणेची अनिवार्य शासकीय कागदपत्रे खालीलप्रमाणे -

- कंपनी अधिनियम 1956 अंतर्गत / Partnership Act अंतर्गत / Propritary Act अंतर्गत / Cooperation Act अंतर्गत / Bombay Public Trust अंतर्गत यापैकी कोणत्याही एका कायदयाअन्वये नोंदणी असणे आणि संबंधित कायदयाच्या मुख्य उददिष्टामध्ये मनुष्यबळ पुरवठा करणेची तरतुद असणे अनिवार्य आहे.
- कामगार कंपनी कायदा नियमावली नुसार खालील चार बाबींची नोंदणी असणे अनिवार्य आहे
  अ.कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटन कार्यालय (EPFO)यांचेकडील नोंदणीप्रमाणपत्र
  ब. ESIC कार्यालय यांचेकडील नोंदणीप्रमाणपत्र
  क. कामगार कल्याण निधी कार्यालय यांचेकडील नोंदणीप्रमाणपत्र
  ड. व्यवसाय कर कार्यालय यांचेकडील नोंदणीप्रमाणपत्र
- वस्तु व सेवा कर नोंदणी क्र. प्रमाणपत्र (GSTIN) असणे अनिवार्य आहे.

प्रकल्प संचालक
जि. ग्रा. वि. यं. वाशीम

Scanned with CamScanner

**I ) डेटा एन्ट्री ऑपरेटर /प्रोग्रॅमर/संगणकाचे ज्ञान असणारे/ टंकलेखनाचे ज्ञान असणारे मनुषयबळ पुरवठा करणेचा पुर्वानुभव (40 गुण) हे गुणांकण खालील निकषांनिहाय देणे.**

i) किती कालावधीकरिता मनुष्यबळ पुरविले - कमाल 20 गुण

| अ.क्र | वर्षे | गुण |
|---|---|---|
| 1 | 1 ते 2 वर्ष | 2 |
| 2 | 2 ते 3 वर्ष | 4 |
| 3 | 3 ते 4 वर्ष | 6 |
| 4 | 4 ते 5 वर्ष | 8 |
| 5 | 5 ते 6 वर्ष | 10 |
| 6 | 6 ते 7 वर्ष | 12 |
| 7 | 7 ते 8 वर्ष | 14 |
| 8 | 8 ते 9 वर्ष | 16 |
| 9 | 9 ते 10 वर्ष | 18 |
| 10 | 10 वर्षापेक्षा जास्त | 20 |

ii) मागील 3 वर्षामध्ये किमान कोणत्याही एका वेळी डेटा एन्ट्री ऑपरेटर /प्रोग्रॅमर/संगणकाचे ज्ञान असणारे/ टंकलेखनाचे ज्ञान असणारे मनुषयबळ शासकीय कार्यालये / खाजगी कार्यालये / खाजगी संस्था इत्यादीना पुरविलेस - कमाल 20 गुण

| अ.क्र | मनुष्यबळ संख्या | गुण |
|---|---|---|
| 1 | 1 ते 5 | 2 |
| 2 | 6 ते 10 | 4 |
| 3 | 11 ते 15 | 6 |
| 4 | 16 ते 20 | 8 |
| 5 | 21 ते 25 | 10 |
| 6 | 26 ते 30 | 12 |
| 7 | 31 ते 35 | 14 |
| 8 | 36 ते 40 | 16 |
| 9 | 41 ते 45 | 18 |
| 10 | 46 पेक्षा जास्त | 20 |

**II) लेखा परीक्षण ताळेबंद (15 गुण)**

मागील 5 वर्षाचे C A Audit आणि Balance Sheet जोडले असलेस वर्षनिहाय प्रति आर्थिक वर्षासाठी 3 गुण याप्रामणे 15 गुण

| अ.क्र | वर्ष | गुण |
|---|---|---|
| 1 | आर्थिक वर्ष 2019-20 | 3 |
| 2 | आर्थिक वर्ष 2018-19 | 6 |
| 3 | आर्थिक वर्ष 2017-19 | 9 |
| 4 | आर्थिक वर्ष 2016-17 | 12 |
| 5 | आर्थिक वर्ष 2015-16 | 15 |

प्रकल्प संचालक
जि. ग्रा. वि. यं. वाशीम

Scanned with CamScanner

**III) शासकीय यंत्रणेसोबत मनुष्यबळ पुरविण्याचा अनुभव (15 गुण)**

शासकीय यंत्रणेसोबत डेटा एन्ट्री ऑपरेटर/प्रोग्रॅमर/संगणकाचे ज्ञान असणारे/ टंकलेखनाचे ज्ञान असणारे मनुषयबळ पुरवठा किती वर्षे केला आहे. याचा अनुभव लक्षात घेऊन गुणदान करणेत यावे.

| अ.क्र. | वर्ष | गुण |
|---|---|---|
| 1 | 1 ते 2 वर्ष | 3 |
| | 2 ते 4 वर्ष | 6 |
| | 4 ते 6 वर्ष | 9 |
| | 6 ते 8 वर्ष | 12 |
| | 7 वर्षापेक्षा जास्त | 15 |

**IV) बाहययंत्रणा संस्थेचे स्थानिक मुख्यालय (10गुण)**

बाहययंत्रणा संस्थेचे नोंदणीकृत मुख्यालय हे संबंधित जिल्हयामध्ये असलेस आणि त्याच जिल्हयामध्ये डेटा एन्ट्री ऑपरेटर /प्रोग्रॅमर/ संगणकाचे ज्ञान असणारे/ टंकलेखनाचे ज्ञान असणारे मनुषयबळ पुरवठा केलेस गुणदान देणेत यावे अन्यथा गुणदान देणेत येऊ नये.

**V) आर्थिक पात्रता - वार्षिक उलाढाल (20 गुण)**

मागील 5 आर्थिक वर्षांची (आर्थिक वर्ष 2015-16 ते आर्थिक वर्ष 19-20) सरासरी वार्षिक उलाढाल सनदी लेखापालाचे वार्षिक उलाढालीचे प्रमाणपत्र व अंकेक्षित ताळेबंद पाहून, तपासुन गुणदान करणेत यावे.

| अ.क्र. | सरासरी वार्षिक उलाढाल | गुण |
|---|---|---|
| 1 | 5 ते 10 लाख | 2 |
| 2 | 10 ते 15 लाख | 4 |
| 3 | 15 ते 20 लाख | 6 |
| 4 | 20 ते 25 लाख | 8 |
| 5 | 25 ते 30 लाख | 10 |
| 6 | 30 ते 35 लाख | 12 |
| 7 | 35 ते 40 लाख | 14 |
| 8 | 40 ते 45 लाख | 16 |
| 9 | 45 ते 50 लाख | 18 |
| 10 | 50 लाखा पेक्षा जास्त | 20 |

**प्रकल्प संचालक**
**जि. ग्रा. वि. यं. वाशीम**

Scanned with CamScanner

## प्रारुप नमुना - अ

## प्रोग्रॅमर आणि डेटा एन्ट्री ऑपरेटर यांची कर्तव्ये व जबाबदा-या

### 1. जिल्हास्तरावरील प्रोग्रॅमर

- राज्यस्तरावरुन प्राप्त झालेले प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण,राज्य पुरस्कृत ग्रामीण घरकुल योजनांचे व पंडीत दिनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थ सहाय्य योजना अंतर्गत भौतिक व आर्थिक उदिष्ट तालुका व संवर्ग निहाय मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे मान्यतेने वाटप करणे.
- मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने प्राप्त झालेले तालुका व संवर्गनिहाय उदिष्ट भौतिक व आर्थिक उददिष्ट Online upload करणे / अदयावत करणे.
- तालुकास्तरावर ग्रामपंचायत निहाय देणेत येणारे प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण,राज्य पुरस्कृत ग्रामीण घरकुल योजनांचे व पंडीत दिनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थ सहाय्य योजना अंतर्गत भौतिक व आर्थिक उदिष्ट वाटप यावर संनियंत्रण करणे.
- जिल्हा, तालुका,ग्रामपंचायतनिहाय संवर्गनिहाय वाटप करणेत आलेल्या उदिष्ट वाटपामधे संनियंत्रण करणे.
- वाटप करणेत आलेले तालुका निहाय उदिष्टांची मंजुरीची रुपरेषा मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मान्यतेने करणे व त्याप्रमाणे करावयाच्या कार्यवाहीसाठी पाठपुरावा करणे.
- ग्रामसभेच्या मान्यतेने संवर्गनिहाय प्राप्त झालेले प्रस्ताव एकत्रितरित्या तालुकास्तरावरुन गट विकास अधिकारी यांच्यामार्फत जिल्हास्तरावर Online उपलब्ध करुन घेणे.
- तालुकास्तरावरुन प्राप्त झालेले प्रस्ताव संवर्गनिहाय उदिष्टानुसार असलेबाबत, योजनेच्या मार्गदर्शक तत्वामधे नमुद केलेप्रमाणे व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सुचनानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे लेखी मान्यता घेणे.
- मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे प्राप्त लेखी मान्यतेनेनुसार प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण,राज्य पुरस्कृत ग्रामीण घरकुल योजनांचे व पंडीत दिनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थ सहाय्य योजना अंतर्गत लाभार्थ्यांना Online मंजुरी देणे.
- Online मंजुरी करणेत आलेल्या लाभार्थ्यांची AwaasSoft वरुन Print काढून प्रकल्प संचालक यांची स्वाक्षरी घेऊन संबंधित वर्षाच्या प्रशासकीय मान्यतेच्या जतन करणे.
- राज्यस्तरावर आवश्यकतेप्रमाणे व वेळोवेळी मागितलेल्या नमुन्यात माहिती पाठविणे.
- मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने AwaasSoft वर लाभार्थ्यांच्या वारंस बदली प्रस्तावाबाबतची माहिती अदययावत करणे.
- जिल्हा व तालुका स्तरावरील डेटा एन्ट्री ऑपरेटर यांचे AwaasSoft व P.F.M.S प्रणाली अंमलबजावणी बाबत प्रशिक्षण घेणे. प्रकल्प संचालक यांचे मान्यतेने जिल्हा स्तरावरील ' आवास दिवस ' कार्यवाहीबाबत सनियंत्रण करणे.
- राज्यस्तरावरुन वेळोवळी देणेत येणा-या तांत्रिक सूचना तालुकास्तरावर निर्गमित करणे.
- तालुकास्तरावरुन येणा-या तांत्रिक अडचणींचे निराकरण जिल्हास्तरावर उपलब्ध असलेल्या पर्यायाद्वारे करणे. सदर पर्यायाद्वारे निराकरण होत नसलेस राज्य स्तरावर सदर अडचणी सोडविणेस Email करणे व यथोचित पाठपुरावा करणे.
- Signatory I & II यांचे DSC activate / deactivate / delete करणेसाठी प्रकल्प संचालक यांचे स्वाक्षरीने PDF mail / पत्रव्यवहार करणे, यथोचित पाठपुरावा करणे.
- सहाय्यक लेखाधिकारी यांनी केलेल्या Reject Order Sheet प्रकल्प संचालक यांचे परवानगीने रदद करणे व त्याबाबतची नोंद दप्तरी ठेवणे.

प्रकल्प संचालक
जि. ग्रा. वि. यं. वाशीम

- नियमीतपणे दररोजपणे तालुकास्तरवरुन प्राप्त झालेले लाभार्थ्यांचे A/C unfreeze करणेचे, sanction order delete / regenerate करणे इ.बाबतचे अहवाल प्राप्त असलेस पडताळणी करुन त्याच दिवशी रात्री 12.00 वाजेपर्यंत लाभार्थ्यांचे A/C unfreeze करणेची कार्यवाही लेखाधिकारी, प्रकल्प संचालक यांचे मान्यतेने करणे.
- प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण, इतर राज्य पुरस्कृत घरकुल योजनांचे व पंडीत दिनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थ सहाय्य योजना लाभार्थींचे Online sanction करणेच्या कामावर संनियंत्रण टेवणे.
- तालुकास्तरावरुन AwaasSoft वरील करणेत येणा-या false success व false reject बाबत लाभार्थीनिहाय तात्काळ प्रकरणे निर्गमित करणे. AwaasSoft वर निर्माण होणा-या false success व false reject Reports चे परिणामकारकरित्या संनियंत्रण करणे.
- AwaasSoft वरील MIS Report द्वारे सर्व तालुक्यांवर संनियंत्रण ठेवणे.
- वेळोवळी राज्यस्तरावर, विभागस्तरावर,जिल्हास्तरावर होणा-या आढावा सभा आणि कार्यशाळासाठी उपस्थित राहणे.
- उपरोक्त सर्व कामकाजाबाबत दैनंदिन प्राप्त संदर्भाची निर्गत नोंदवही ठेवून ती सदैव अदययावत ठेवणे.
- मुख्य कार्यकारी अधिकारी / प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांचे आदेशाप्रमाणे अन्य कामकाज पाहणे.

### 2. जिल्हास्तरावरील डेटा एन्ट्री ऑपरेटर

- प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण,राज्य पुरस्कृत ग्रामीण घरकुल योजनांचे व पंडीत दिनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थ सहाय्य योजना अंतर्गत योजनांचे अंमलबजावणी विषयक पत्रव्यवहार तालुकास्तरावर निर्गमित करणे.
- विविध योजनांचे AwaasSoft वर उपलब्ध असणारे अहवाल वेळोवेळी जिल्हा / तालुका स्तरावर होणा-या मिटींगसाठी उपलब्ध करुन देणे.
- AwaasSoft वरील सर्व MIS Reports वेळोवेळी पहाणे, Analysis करणे, त्यावरुन दैनंदिन संनियंत्रण करणे, सदर Reports हे प्रकल्प संचालक व Programmer यांचेकडे सादर करणे.
- ग्रामीण गृहनिर्माण योजना संदर्भातील आढावा सभा, बैठका इत्यादीचे इतिवृत्त ठेवणे.
- उपरोक्त सर्व कामकाजाबाबत दैनंदिन प्राप्त संदर्भाची निर्गत नोंदवही ठेवून ती सदैव अदययावत ठेवणे.
- मुख्य कार्यकारी अधिकारी / प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांचे आदेशाप्रमाणे सर्व कामकाज पाहणे.

### 3. तालुकास्तरावरील डेटा एन्ट्री ऑपरेटर

- जिल्हास्तरावरुन प्राप्त झालेले प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण,राज्य पुरस्कृत ग्रामीण घरकुल योजनांचे व पंडीत दिनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थ सहाय्य योजना अंतर्गत भौतिक व आर्थिक उदिष्ट ग्रामपंचायत निहाय व संवर्ग निहाय गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांचे मान्यतेने वाटप करणे.
- गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांचे मान्यतेने प्राप्त झालेले ग्रामपचांयत व संवर्गनिहाय भौतिक व आर्थिक उदिष्ट Online upload करणे.
- प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण,राज्य पुरस्कृत ग्रामीण घरकुल योजनांचे व पंडीत दिनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थ सहाय्य योजना अंतर्गत लाभार्थीचे AwaasSoft वर अचूक Online registration करणेसाठी विहित नमुन्यात माहिती ग्रामसेवक व ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांचेद्वारे उपलब्ध करुन घेणे. सदरील माहिती तपासून त्यास गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांची मान्यता घेऊन कार्यवाही करणे.
- ग्रामसभेचे मान्यतेने प्राप्त झालेले संवर्गनिहाय प्रस्ताव मंजूरीसाठी गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांचे मान्यतेने प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांचेकडे Online पाठविणे.

**प्रकल्प संचालक**
**जि. ग्रा. वि. यं. वाशीम**

Scanned with CamScanner

- प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांचेकडून प्राप्त झालेल्या Online प्रस्तावांची Ordesheet Generate करणे.
- ' Ordesheet Generate Register ' ठेवणे व त्यातील नोंदी तारिखनिहाय अदययावत ठेवणे.
- Signatory I & II यांचे DSC Enroll, registration करणे या संदर्भात कार्यवाही करणे.
- ग्रामपंचायत निहाय येणा-या तांत्रिक अडचणीचे निराकरण तालुकास्तरावर उपलब्ध असलेल्या पर्यायाद्वारे करणे. सदर पर्यायाद्वारे निराकरण होत नसलेस जिल्हास्तरावर सदर अडचणी सोडविण्यास पत्रव्यवहार / Mail करणे व यथोचित पाटपुरावा करणे.
- जिल्हास्तरावर वेळोवेळी घेणेत येणा-या AwaasSoft व PFMS प्रणाली अमंलबजावणी प्रशिक्षणासाठी उपस्थित रहाणे.
- AwaasSoft वरील MIS रिपोर्टद्वारे सर्व ग्रामपंचायतीचे सनियंत्रण ठेवणे.
- A/C freeze झालेल्या लाभार्थ्यांचे A/C unfreeze करावयाचे असल्यास जिल्हास्तरावर गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांचेमार्फत पत्रव्यवहार करुन यथोचित पाटपुरावा करणे.
- गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांनी त्यांच्या Signatory II DSC द्वारे लाभार्थ्यांचे false success व false reject च्या केलेल्या कार्यवाहीच्या नोंदी तारिखनिहाय अदययावत ठेवणे.
- प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण,राज्य पुरस्कृत ग्रामीण घरकुल योजनांचे Geo Tagging करणे, प्रथम हप्ता, द्वितीय हप्ता, तृतीय हप्ता इत्यादीचे ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांनी Mobile App द्वारे काढलेल्या फोटोंचे Selection / Rejection करणे.
- उपरोक्त सर्व कामकाजाबाबत दैनंदिन प्राप्त संदर्भाची निर्गत नोंदवही ठेवून ती सदैव अदययावत ठेवणे.
- केंद्र व राज्य पुरस्कृत योजनांची माहिती आढावा बैठकीच्या वेळीस सादर करणे ग्रामीण गृहनिर्माण योजना संदर्भातील आढावा सभा, बैठका इत्यादीचे इतिवृत्त ठेवणे.
- गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांचे आदेशाप्रमाणे सर्व कामकाज पाहणे

प्रकल्प संचालक
जि. ग्रा. वि. यं. वाशीम

Signature Not Verified
Digitally signed by VINOD NARAYANRAO WANKHADE
Date: 2020.08.11 20:31:20 IST
Location: Maharashtra-MH

Scanned with CamScanner